दै. देशोन्नती दि. ०८।१२।२५

# ‘स्थागुशा’च्या पथकाने गोवंशाची वाहतूक करणारे वाहन पकडले

## ५ गोवंशाची सुटका ; सव्वानऊ लाखांचा मुद्देमाल जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ७ डिसेंबर रोजी केलेल्या कारवाईत गोवंशाची वाहतूक करणारे वाहन जप्त करून ५ गोवंशाची सुटका केली. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये ९ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ७ डिसेंबर रोजी गस्त दरम्यान पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकाने गस्त दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार गोवंश जातीचे जनावरे कत्तल करण्याचे उद्देशाने वाहतूक करणारी बोलेरो पिकअप वाहन क्रमांक. एम.एच.- ०२-एफ.जी.-०९७८ या मध्ये गोवंशीय जनावरे कोंबून भरुन आलुपेज मार्केटजवळ गाडेगावकडे जाणाऱ्या मार्गावर सकाळी ६ वाजता छापा मारून अवैधरित्त्या ५ गोवंशीय जनावरे व वाहतुक करणारे बोलेरो पिकअप वाहन असा एकूण ९ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी व मुद्देमाल नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात दिला. याप्रकरणी आरोपी नसीर बशीर कुरेशी व शेख कलीम कुरेशी शेख मुसा कुरेशी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पथकात पोउपनि नागनाथ तुकडे, सपोउपनि दारासिंग राठोड पोहेकॉ मोहन हाके, सुनिल गटलेवार, आबाराव पिंगलवाड यांचा समावेश होता.